# प्रेसनोट

दि.०५/०१/२०२१

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | नाशिक/अहमदनगर |
| गुन्हा नोंद क्रमांक | जामखेड पो.स्टे., जि.अहमदनगर येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया चालु आहे. |
| कलम | लाचलुचपत प्रतिबंधक कायदा सन १९८८ (संशोधन) सन २०१८ चे कलम ७, ७(अ) |
| आरोपीचे नांव व कार्यालय | १) सज्जन किसन ना–हेडा, वय–३६ वर्ष, पोलीस उप निरीक्षक, वर्ग–२, जामखेड पोलीस स्टेशन, जि.अहमदनगर रा.मोरे वस्ती, थोरवे यांचे घरात भाडयाने, जामखेड मुळ रा.निहालसिंग वाडी, ता.अंबड, जि.जालना<br>२) तुकाराम रामराव ढोले,वय–३८ वर्ष,रा.मोरे वस्ती,जामखेड,जि.अहमदनगर (खाजगी इसम) |
| मागणी केलेल्या लाचेची रक्कम | रुपये ५०,०००/– तडजोडीअंती रुपये ३०,०००/– |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | रुपये ३०,०००/– |
| थोडक्यात माहिती | प्रस्तुत बातमीतील हकीगत अशी की, यातील तक्रारदार यांच्या भावास जामखेड पोलीस स्टेशन गुरनं.६९८/२०२० या गुन्हयात अटक करुन पोलीस कस्टडी रिमांड घेतली आहे. गुन्हयाचे तपासात मदत करण्यासाठी व तक्रारदार यांचे भावास सीआरपीसी १६९ प्रमाणे गुन्हयातुन बाहेर काढण्यासाठी म्हणून १,००,०००/– रुपये लाचेची मागणी केली. तक्रारदार यांचे तक्रारी प्रमाणे दि.५/१/२०२१ रोजी केलेल्या लाच मागणी पडताळणीत यातील आरोपी लोकसेवक क्र.१ सज्जन किसन ना–हेडा, पोलीस उप निरीक्षक यांनी आरोपी क्र.२ तुकाराम रामराव ढोले यांचे उपस्थितीत तक्रारदार यांचेकडे ५०,०००/– रुपये लाचेची मागणी पंचासमक्ष करुन तडजोडीअंती ३०,०००/– रुपये लाचेची मागणी करुन ती आरोपी क्र.२ यांचेकडे हॉटेल कृष्णा येथे देण्यास सांगितली. त्याप्रमाणे दि.५/१/२०२१ रोजी आयोजित लाचेच्या सापळा कारवाई दरम्यान ३०,०००/– रुपये लाचेची रक्कम आरोपी क्र.२ तुकाराम रामराव ढोले यांनी आरोपी क्र.१ सज्जन किसन ना–हेडा यांचेसाठी हॉटेल कृष्णा, जामखेड समोर पंचासमक्ष स्वीकारली असता आरोपी क्र.२ ढोले यांना रंगेहाथ पकडण्यात आले असून आरोपी क्र.१ ना–हेडा यांना सुध्दा ताब्यात घेण्यात आले आहे. |

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागण्या–या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य यांच्याशी संपर्क करावा.

संपर्क पत्ता :– लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालय, जिल्हा मध्यवर्ती प्रशासकिय इमारत,
टि.व्ही. सेंटरसमोर, सावेडी, अहमदनगर

संकेतस्थळ :– acbmaharashtra.gov.in

ई–मेल :– acbwebmail@mahapolice.gov.in

ऑनलाईन तक्रार

ॲप्लीकेशन :– acbmaharashtra.net

टोल फ्री क्रमांक :– १०६४

दुरध्वनी क्रमांक :– ०२४१–२४२३६७७

व्हॉटस अप क्रमांकः– ९९३०९९७७००

( श्याम रा.पवरे )
पोलीस निरीक्षक
ॲन्टी करप्शन ब्युरो,अहमदनगर